# नकला व शोध

# Copy & Search

- नोंदणी कायदयाचे कलम 57 नुसार नोंदणी झालेल्या दस्तांचे अभिलेखांच्या नकला मिळणे व त्यांचा शोध /पाहणी करणे याबाबतच्या स्पष्ट तरतुदी आहेत. त्यानुसार,

- **नकला** - दुय्यम निंबधक कार्यालयात नोंदणी झालेल्या काही दस्तांचे अपवाद वगळता, उर्वरीत सर्व दस्तांच्या अभिलेखांच्या ज्यामध्ये दस्ताची व दस्ताची सूची यांच्या नकला विहीत फी अदा केल्यास मिळतात.

**शोध-** एखादया मिळकतीसदंर्भात पूर्वी कोणत्या दस्ताची नोंदणी पूर्ण झाली आहे याची दुय्यम निबंधक कार्यालयातील अभिलेखांची पाहणी करून माहिती घेणे याला पाहणी/शोध (Inspection & Search) घेणे असे संबोधले जाते. हा शोध (Search) पुढील मार्गाने घेता येतो.

अ. मिळकतीसंदर्भात नोंदणी झालेल्या दस्ताचा अनुक्रमांक/ वर्ष माहित असल्यास त्या विशिष्ट दस्त / त्या दस्ताच्या सूची 2 ची पाहणी करणे (दस्तनिहाय) किंवा
ब. मिळकतीसंदर्भात नोंदणी झालेल्या दस्ताचा अनुक्रमांक/ वर्ष माहित नसल्यास १.त्या विशिष्ट मिळकतीसंबधी नोंदणी झालेल्या सर्व दस्तांच्या / त्या दस्तांच्या सूची क्र. 2 ची पाहणी करणे (मिळकतनिहाय) किंवा
क. विशिष्ट व्यक्ती पक्षकार असलेल्या सर्व दस्तांची / त्या दस्तांच्या सूची क्र.1 ची पाहणी करणे (नावनिहाय)

- याबाबत अधिक माहीतीसाठी पहा याच संकेतस्थळावरील सारथी >FAQ> दस्त नोंदणी > दस्तांच्या तसेच सूचीच्या प्रमणित नकला, दस्ताची पाहणी व शोध.